# सायखेडा पोलीस स्टेशन,नाशिक ग्रामीण

## गुन्हा रजि.नं.३५/२०२३ भा.द.वि.का.क.३०२,२०१

## (खुनाचे गुन्ह्याचे प्रसिध्दी पत्रक )

सायखेडा पोलीस ठाणे नाशिक ग्रामीण कडील गुन्हा रजि. नं.३५/२०२३ भा.द.वि.का. कलम ३०२, २०१ प्रमाणे फिर्यादी नामे अशपाक इब्राहिम शेख वय ५३ वर्ष,धंदा : व्यापार व ग्रामपंचायत सदस्य,रा.सायखेडा,ता.निफाड,जि.नाशिक यांनी दि.११/०२/२०२३ रोजी फिर्याद दिली की, दि.११/०२/२०२३ रोजी सायंकाळी ०५/३५ वा.पुर्वी वेळ नक्की नाही सायखेडा शिवारात, गंगानगर देवीमंदिर जवळ, गोदावरी नदीपात्रात कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन अनोळखी पुरुष इसम अंदाजे वय २८ ते ३० वर्ष याचा खुन करुन त्याचे डोके (शिर) मानेपासुन वेगळे करुन डोके कोठेतरी फेकुन देऊन त्याचे धड हे पोत्यात (बारदान) टाकुन दोन्ही पोते (बारदान) हे तारेने बांधुन पोत्यासह (बारदान) मृतदेह हा पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने गोदावरी नदीपात्रात टाकुन दिले म्हणुन माझी अज्ञात इसमाच्या विरोधात तक्रार आहे वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा रजिष्टरी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

## मयताचे फोटो











**मयताचे वर्णन – वय अंदाजे २८ ते ३० वर्ष अंगात तपकिरी काळे, पिवळसर चेक्सचा** LEE **कंपनीचा** XL **साईजचा हाफ बाहिचा शर्ट व निळया रंगाची** KAP - 10 **कंपनीची जिन्स पॅन्ट व निळया रंगाची अंडरपॅन्ट.**

**उजव्या हाताचे मनगटावर अंगठ्याजवळ ★★★(तीन स्टार ) गोंदलेले . त्या शेजारी ॐ गोंदलेले व त्या शेजारीच माँ गोंदलेले, उजवे हाताच्या कांबीवर हितेश नाव गोंदलेले. उजवे दंडावर माँः नाव गोंदलेले तसेच उजवे हाताचे मनगटात पिवळ्या रंगाचा रबर बॅन्ड त्यावर काळा व सफेद रंगाची गोलाकार डिझाईन असलेली.**

**तरी वरील अनोळखी इसमाचे व अज्ञात मारेकरी यांचे बाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ खालील नंबरवर संपर्क साधुन माहिती द्यावी. माहिती देणारे याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल व त्यांना योग्य बक्षीस देण्यात येईल.**

**संपर्क : नाशिक ग्रामीण कंन्ट्रोल रुम - ०२५३ - २२००४०१ / ४९० / ४९५**
**सायखेडा पोलीस ठाणे नाशिक ग्रामीण - ०२५५० - २३२२३३**
**सहा.पोलीस निरीक्षक पी.वाय.कादरी मो.न. ९५९४०५९९८०**
**पो.उप.निरी.विजय गायकवाड मो.नं. ८२०८३७०४९०**